# कृषी उद्योजकता

**डॉ . साहेबराव क्षीरसागर**
कृषी वित्त विशेषज्ञ, नाशिक
मो.नं. – ९६२३१८७६७९

पूर्वीच्या काळी उपजीविकेचे साधन म्हणून भारतीय शेतकरी शेती करीत आलेला आहे. शेतीकडे व्यवसाय म्हणून दृष्टिकोन ठेवण्याची वृत्ती गेल्या ५०–६० वर्षातच वाढीला लागलेली आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी शेतीमध्ये नफ्या तोटयाचा फारसा शास्त्रीय विचार होत नसे. शेतीवर स्वत:च्या कुटूंबाची उपजीविका चांगल्या प्रकारे झाली म्हणजे शेतकरी संतुष्ट असे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात विकसित झालेल्या नवीन कृषी तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये होवू लागला आहे. उत्पादन खर्चात देखील खूपच वाढ झालेली आहे. शेतीमध्ये वाढते भाग भांडवल लागू लागलेले आहे. त्यामुळे कृषी अर्थशास्त्र (ॲग्रीकल्चर एकॉनॉमिक्स) ही नवीन शास्त्र शाखा गेल्या दीडशे / दोनशे वर्षात जन्माला आलेली आहे. तसेच गेल्या ४०–५० वर्षात कृषी व्यवस्थापन (ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट) ही नवीन शाखा प्रगत होऊ लागलेली आहे.

ज्ञानेश्वर माऊली काळी, शेती व्यवसायातील कर्ज, नफा–तोटा यांचा अजिबातच विचार होत नसे असे मात्र नाही. माऊलींनी म्हतारपणाच्या दूरवस्थेचे वर्णन करतांना म्हटले आहे.

**कुळवाडी रिणे दाटली । कां वाकडिया ढोरे बसली ।**

**तैंसी नुठी काही केली । जीभचि हे ।। १३/८/१९६६**

शेतकीचा धंदा, जसा कर्जाने ग्रस्त झाला असता, उर्जित दशेला येत नाही, अथवा झडीच्या पावसाने, जशी एकदा गुरे बसली म्हणजे ती उठत नाहीत, त्याप्रमाणे म्हतारपणी जीभ काही केल्याने हालणार नाही. कर्जग्रस्त शेती धंद्याची तुलना तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी, म्हतारपणामुळे (लगबगीने) न हालणाऱ्या जिभेशी करुन फार मोठे औचित्य साधले आहे.

**तात्पर्य** : कृषी व्यवसाय हा आता एक उद्योग समजला जात असून हा व्यवसाय यशस्वी होण्यासाठी कुशल उद्योजकांची आवश्यकता आहे.

**उद्योजकता –**

जेव्हा एखादी नवीन व्यक्ती उद्योग सुरु करीत असतो, त्या कृतीमध्ये तीन घटक सर्वात महत्वाचे ठरत असतात. ते घटक म्हणजे उद्योग करणारा उद्योजक, उद्योग करण्याची पात्रता लायकी असणे म्हणजे उद्योजकता, तिसरा घटक म्हणजे उद्योग जे करायचे आहे तो भाग. थोडक्यात 'उद्योजकता' कोणत्याही उद्योगाचा आत्मा असतो. साधारणपणे असा समज आहे की, उद्योजकता ही नैसर्गिक देणगी असून काही ठराविक जाती जमातीच्या व्यक्तीच उद्योजक होऊ शकतात मात्र प्रत्येक व्यक्तीमध्ये उद्योजकतेचे गुण सुप्त प्रमाणात कमी–अधिक प्रमाणात असून प्रसंगानुरुप ते प्रत्यक्षात येतात.

सध्याच्या ग्लोबल युगात उद्योजकता हा शब्द परवलीचा झाला आहे. या युगात सर्वच क्षेत्रात उद्योजकते शिवाय तरणोपाय नाही ही

मानसिकता हळूहळू रुजत आहे. आपले विचार एक प्रकारचा कारखाना आहे. त्या कारखान्यातून कोणता माल बाहेर काढायचा हे मात्र आपण स्वतः ठरवायचे. उद्योजक ज्या पध्दतीची कृती, वर्तणूक करतो त्याचा परिणाम सकारात्मक किंवा नकारात्मक उद्योगावर होतो. सर्वसाधारणपणे प्रेरणांची निर्मिती पुढील घटकांमुळे मिळत असते. भय, विश्वास, अविश्वास, सल्ला, अनुकरण, आशीर्वाद, वस्तूस्थिती, स्वार्थ, प्रेम, अधिकार, लालसा, अनिश्चितता, समाधान, असमाधान, आनंद, इ. घटकांतून उद्योजकास प्रेरणा मिळत असते. उद्योजकास संधीवर झडप घालण्याची सवय असावी. त्यास संधीचा शोध घ्यावा लागतो. तसेच उद्योजकांचे विचार फक्त हवेत विरुन न जाता त्याचे कृतीमध्ये रुपांतर करावे लागते. उद्योजकात परिश्रम करण्याची तयारी असावी. कारण उद्योगात वेळ, पैसा व श्रमाची आहूती द्यावी लागते तेव्हाच यशाची फळे येतात.

**कृषी आधारित लघू उद्योग व संधी -**

भारतातील ग्रामीण भागातील ढासळलेले जीवनमान, अपार दारिद्रय, नैसर्गिक आपत्ती आणि लहरी हवामान आणि पावसामुळे शेती आणि शेतकरी यांची परिस्थिती विदारक आहे. त्यासाठी केवळ शेतीवर अवलंबून न राहता, ग्रामीण भागात आर्थिक पुर्नरचनेसाठी भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, पुरक लघुउद्योग, शेतीसाठी आवश्यक कृषी उद्योग मोठया प्रमाणावर सुरु होणे गरजेचे असून अशा उद्योगांना प्रचंड वाव आहे. महाराष्ट्रात कृषी उद्योगांना भरपूर प्रमाणात सर्वत्र वाव आहे. अशा कृषी उद्योगांमुळे राष्ट्राचे आर्थिक उत्पन्न वाढून शेतकरी वर्गाचे राहणीमाण उंचावण्यास खरी मदत होईल. आज केवळ शेतीची उत्पादन क्षमता वाढवून चांगला रोजगार निर्माण होईल ही परिस्थिती आज शक्य नाही कारण शेतीचे विभाजन व त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक योजनांचा मुख्य उद्देश लोकांची राहणीमान उंचावणे, कृषीपूरक उद्योग वाढविणे, कृषी-उत्पादन वाढ करुन आयात-निर्यात क्षमता वाढविणे गरजेचे झाले आहे.

कृषी उद्योग हे केवळ पूरक उद्योग व्यवसाय न ठरता पूर्ण व्यावसायिकपणे करणे गरजेचे आहे. पशुपालन, पॉली हाऊस, ग्रीन हाऊस, शेडनेट, फुलशेती, फलोद्यान, रेशीम उद्योग, कुक्कुट पालन, दुग्धव्यवसाय उतीसंवर्धन, रोपवाटीका, वनौषधी लागवड प्रक्रिया, फळे व भाजीपाला लागवड प्रक्रिया, तेलबिया व डाळ प्रक्रिया, गांडूळ खत निर्मिती, कृषी अवजारे व साधने इ. अनेक कृषी उद्योगांद्वारे शेतकरी कुटुंबाचा, गावाचा, राज्याचा आणि परिणामी आपल्या देशाचा आर्थिक विकास होऊ शकतो. सध्याच्या कृषी उद्योगात केवळ चरितार्थाचा भाग म्हणून शेती व जोडधंदे न करता त्यांचे व्यावसायिकीकरण करणे गरजेचे आहे. कृषी उद्योग क्षेत्रातील नवनवीन संधी आत्मसात करणे, यशस्वी प्रकल्पांची माहिती घेऊन प्रशिक्षण घेणे हया मार्गांनी हे शक्य आहे. कृषी उद्योगाद्वारे स्वतःचा व राष्ट्राचा विकास ही आजच्या काळाची व भविष्याची खरी गरज आहे.

कृषी उद्योग कोणास म्हणावे ? याचे चार निकष नियोजन मंडळाने सांगितले आहेत. राष्ट्रीय विकास मंडळानेही त्यांना नंतर मान्यता दिली असून ते चार निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. शेतीला लागणारे साहित्य व साधने यांची निर्मिती करणारे उद्योग.

२. ज्या उद्योगांमुळे शेतमालावर प्रक्रिया करणे सुलभ होते असे उद्योग.

३. प्रक्रिया केलेल्या मालाला ज्यामुळे चांगली किंमत प्राप्त होण्यास मदत होते असे उद्योग.

४. शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास साह्यभूत होणारे अनेक कृषी उद्योग.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शेती व औद्योगिक विकास महामंडळास कृषी उद्योगांच्या विकासासाठी नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी दिली आहे.सदरील महामंडळाची कार्यालये सर्व जिल्हा स्तरावर आहेत.

**संभाव्य अनेक कृषी उद्योगसंधी -**

**१. पशुपालन व प्रक्रिया उद्योग -**

गाय व म्हैस पालनातून दुग्ध निर्मिती व दुग्धजन्य उत्पादने तसेच पशुखाद्य तयार करणे. शेळीपालन, मेंढीपालन, ससेपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, मस्त्य उद्योग इ. संगोपनातून मांस प्रक्रिया प्रकल्प व बोनमिल इ.

**२. मधुमक्षिकापालन उद्योग -**

मध, मेण, पराग, रॉयल जेली इ. उत्पादने तयार करणे.

**३. रेशीम उद्योग -**

रेशीमपासून कापड विणणे, शस्त्रक्रियेसाठी लागणारा धागा, विद्युतरोधक सामान, पॅरॅशूटसाठी लागणारे कापड इ. तयार करणे.

**४. नर्सरी उद्योग -**

शोभिवंत झाडे, विविध प्रकारची फुले, फळांची रोपे (कलमे) तयार करणे.

**५. फुलशेती उद्योग (पॉली हाऊस, ग्रीन हाऊस) -**

फुलशेतीतून विविध फुलांची पैदासवार करणे व विक्री करणे तसेच सुगंधी द्रव्ये व उत्पादने तयार करणे.

**६. वनौषधी लागवड प्रक्रिया -**

वनौषधी वनस्पतींमधील नेमके गरजा ओळखून मागणी असलेल्या वनौषधींची लागवड करणे. उदा. सर्पगंधा, शतावरी, सफेद मुसळी तसेच अनेक उपयुक्त वनौषधी वनस्पतीपासून विविध वनौषधी तयार करणे.

**७. उतीसंवर्धन (टिश्यूकल्चर) -**

उतीसंवर्धनातून अनेक रोपांची निर्मिती करुन नर्सरीद्वारे विक्री करणे.

**८. फळ व भाजीपाला प्रक्रिया -**

फळ व भाजीपाला इत्यादीवर प्रक्रिया व निर्जलीकरण करुन विविध प्रकारची खाद्यपेय, पदार्थ निर्मिती करणे.

**९. शेती मालावर आधारित प्रक्रिया -**

ऊस, कापूस, सरकी, तंबाखू, तेलबिया, कडधान्ये, धान्य, गहू, ज्वारी, बाजरी, मका इ. शेतीमालापासून प्रक्रिया करुन उत्पादने तयार करणे उदा. साखर, तेल, विविध प्रकारची खादयपदार्थ तयार करणे.

**१०. अळिंबी लागवड प्रक्रिया -**

अळिंबी लागवडीतून खाद्य पदार्थ निर्मिती.

**११. कृषी अवजारे व साधने -**

ट्रॅक्टर्स, इलेक्ट्रीकल मोटार्स, इंजिन्स, सबमर्सिबल पंप, आंतर व पूर्वमशागतीची अवजारे, वाहतुकीसाठी लागणारे अवजारे, किटकनाशके फवारणी, धुरळणी करणारी यंत्रे, खते देणारी यंत्रे, ठिंबक सिंचन, पी.व्ही.सी. पाईप, पॉली हाऊस व ग्रीन हाऊससाठी लागणारे विविध साहित्य इ. कृषी उत्पादने तयार करणे.

**१२. कंपोस्ट खत -**

कृषी सल्ला सेवा केंद्र, टेस्टींग लॅब, माती परिक्षण, शेतीमाल विक्री केंद्र, कृषी सेवा केंद्र, कृषी बी-बियाणे केंद्र इ.

**ग्रामीण भागात छोटे व्यवसायांचा विकास -**

**छोटे व्यवसायांची वैशिष्टये -**

१. कमी भांडवलाची आवश्यकता.

२. उपलब्ध असलेल्या स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग.

३. साध्या सोप्या उत्पादन पद्धतींचा वापर.

४. ग्रामीण पातळीवर, पुरुषांत/महिलांमधील सुप्त गुण व क्षमतेचा वापर.

५. कुटुंबाचे सध्याचे उत्पन्नात हातभार-अर्धवेळ किंवा पुर्णवेळ काही कुटुंब सदस्यांनी काम करुन विविध व्यवसाय बचत गटांद्वारे सुरु केल्यास त्यात यश मिळण्याची व कमी जोखमीची शक्यता.

**व्यवसाय यशस्वीपणे करण्यासाठी खालील गुणांची जोपासना आवश्यक -**

१. कर्तृत्व - व्यवसाय यशस्वी करण्याची इर्षा / मनापासून इच्छा व आत्मविश्वास व निर्णय क्षमता.

२. धोका पत्करण्याची तयारी.

३. अडचणींचा सामना करण्याची तयारी / क्षमता.

४. नेतृत्त्व गुण, व्यवसाय / विक्री कौशल्य.

५. व्यवसाय वाढीची दूरदृष्टी.

प्रशिक्षणाद्वारे उद्योजकता असलेल्या वरील गुणांचा विकास करता येतो.

**व्यवसायाची निवड कशी करता येईल ?**

१. स्वत:ची क्षमता / कौशल्य लक्षात घेता, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून कोणता व्यवसाय करता येईल.

२. निवडलेल्या व्यवसायात अनुकूल साधन संपत्तीची उपलब्धता व्यवसायास वाव.

३. उत्पादन तंत्राची व गुणवत्ता निकषांची माहिती / जाण.

४. उत्पादित वस्तूस बाजारात मागणी/सध्याचा पुरवठा व वाव असलेल्या बाजारपेठांची माहिती.

५. व्यवसाय एकटीने/संयुक्तपणे/गटाने करावयाचा.

६. भांडवलाची गरज व कसे उभे करणार.

७. कच्च्या मालाची यंत्रसामग्री उपलब्धता–मापक दरात, चांगल्या प्रतीचा.

८. व्यवसाय आर्थिक दृष्टया फायदेशीर.

**व्यवसाय सुरु करतांना खालील बाबींची पूर्तता करावी –**

१. आवश्यक ते प्रशिक्षण पूर्ण करणे.

२. भांडवल उभारणी.

३. कच्चा माल/यंत्रसामुग्री खरेदी, योग्य जागेची व्यवस्था.

४. आवश्यक त्या मदतनीसांची/कामगारांची निवड.

५. उत्पादन कार्यक्रमाची आखणी/व्यवसायाची व्याप्ती.

६. उत्पादन.

७. विक्रीची व्यवस्था.

८. अर्थसहाय्याची सेवा शुल्कसहित ठरलेल्या कालावधीत परतफेड.

९. व्यवसाय वाढीसाठी नियोजन/कार्यवाही.

**विक्री व्यवस्थापन –**

१. योग्य बाजारांची पाहणी व निवड.

२. आपल्या वस्तूसांठी सध्या बाजारात मागणी व पुरवठा याचा अभ्यास.

३. ग्राहकांच्या आवडी निवडी व त्यात होणाऱ्या बदलाचा अभ्यास.

४. तयार वस्तूची आकर्षक वेष्टणात व योग्य मापात विक्री.

५. आपण करत असलेल्या खर्चाची, आपले स्पर्धक उत्पादकांचे उत्पादन खर्चाशी व गुणवत्ते बरोबर तुलना.

६. मालाचे गुणवत्तेत सातत्यता व प्रमाणीकरण.

७. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सतत प्रयत्न व माफक भावात विक्री.

८. मालाची विक्री केंद्रात/बाजारात नियमित उपलब्धता.

९. विक्री माध्यमांना/विक्रेत्यांना योग्य मोबदला.

**विक्रीमाध्यम / पध्दती –**

१. स्वत: ग्राहकांकडे/दुकानदारांकडे जाऊन अथवा स्वत:चे दुकानात विक्री.

२. ठोक व फुटकळ विक्री.

३. मोठे उद्योजक/व्यापाऱ्यांना विक्री/त्यांचेकडे वस्तू विक्रीस ठेवणे.

४. दुसऱ्याचे मदतीने विक्री.

५. विक्री वितरकांद्वारे ठोक भावात विक्री.

६. मोठया शहरात विक्री केंद्राद्वारे.

७. प्रदर्शानात/जत्रांमध्ये विक्री.

८. सरकारी/खादी ग्रामोद्योग विक्री केंद्रात वस्तू ठेवून विक्री.

**उद्योजकाची कौशल्ये आणि व्यवसाय निवड –**

**कौशल्ये –**

उद्योग केवळ स्थापित करुन भागत नाही तर तो यशस्वीपणे पुढे न्यावा लागतो. यासाठी उद्योजकाकडे अनेक प्रकारची गुणवत्ता व कौशल्ये असावी लागतात. काही जणांना ही कौशल्ये उपजत प्राप्त असतात. काही जणांना ही संस्कार व प्रशिक्षणाने मिळतात तर काही जण परिश्रमपूर्वक आत्मसात करतात. ही कौशल्ये खालीलप्रमाणे –

**साहसी :**

उद्योजक हा वाजवी जोखीम घेणारा असतो.

**संधी शोधक :**

उद्योजक सतत नवीन व्यवसायाच्या, नवीन प्रकल्पांच्या, नवीन कल्पनांच्या संधी शोधत असतो.

**उच्च गुणवत्तेचा ध्यास :**

आपले उत्पादन हे इतर कंपन्यांच्या उत्पादनांचा दर्जापेक्षा अथवा याबाबत असलेल्या किमान गुणवत्तेपेक्षाही उत्कृष्ट

बनविण्याचा प्रयत्न उद्योजक करतो.

**बांधिलकी :**

ग्राहकांना कबूल केलेल्या वेळपूर्वी उत्पादन देण्यासाठी उद्योजक वाटेल ते परिश्रम करतो.

**उच्च कार्यक्षमता :**

तुटपुंज्या साधनसामुग्रीवर कमी खर्चात व कमी वेळेत उत्पादन देण्याचे कौशल्य उद्योजकाच्या अंगी असते.

**सुयोग्य नियोजन :**

उद्योजक आपले लक्ष्य गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने सुयोग्य नियोजन करतो.

**पूर्ण आत्मविश्वास :**

उद्योजकाला आपल्या कर्तृत्वावर पूर्ण भरवसा असतो.

**चैतन्यमयी व्यक्तिमत्व :**

उद्योजकाचे व्यक्तिमत्व हे सदा प्रसन्न व चैतन्यमयी असते त्यामुळे इतरांना प्रेरणा मिळते.

**पुढाकार :**

कुठलेही काम इतर कुणी सांगण्यापूर्वीच व इतरांना सुचण्यापूर्वी तो करतो.

**संभाषण चतूर :**

उद्योजकाला चांगली संभाषण कला अवगत असावी लागते, त्यामुळे आपला मुद्दा इतरांना तो प्रभावीपणे पटवून देऊ शकतो.

**विश्वासार्हता :**

दिर्घकालीन यशासाठी व्यवसायात विश्वासार्हता फार महत्त्वाची असते. केलेले करार पाळणे, दिलेला शब्द पाळणे यासारख्या कृतीमधून ही विश्वासार्हता निर्माण होते.

**संघर्षशील :**

पहिली एक ते दोन वर्षे उद्योजकासाठी आव्हांनाची व संघर्षांची असतात या आव्हांनाना सामोरे जाण्याची तुमची तयारी हवी. या आव्हानांना समर्थपणे तोंड देऊन प्रस्थापित व्हावे लागते.

**जबाबदारी :**

समजा तुम्ही घरी जायला निघालात आणि यंत्र बंद पडले. ऑर्डरचा माल तुम्हाला उद्याच द्यायचा आहे, या घटनेकडे दुर्लक्ष करुन तुम्हाला घरी जाता येणार नाही.

**कुटुंबाचीची साथ :**

व्यवसाय स्थिरस्थावर होईपर्यंत तुम्हाला स्वत:ला कामाचा भार वाहावा लागतो कदाचित कुटुंबासाठी तुम्ही वेळ देखील देऊ शकणार नाहीत. तुमच्या कुटुबांची साथ अशा वेळी महत्त्वाची आहे.

**पैशाची विवंचना :**

व्यवसायाच्या सुरुवातीस भांडवलाचे फार मोठे महत्त्व आहे. अनेक वेळा उद्योगाला भांडवल अपुरे पडते. कुणीही मदत करायला तयार होत नाही. स्वत: कुटुबांच्या खर्चाला सुध्दा कात्री लावायची वेळ येते.

**कौशल्य विकास –**

यशस्वी उद्योजकासाठी वर उल्लेखनीय अनेक कौशल्ये आपण पाहिली. यापैकी काही तुमच्याकडे असतील आणि काही नसतील पण दृढ इच्छाशक्ती असेल तर तुम्ही पण ती आत्मसात करू शकता, वाढवू शकता. त्यासाठी खालील पायऱ्या वापराव्या लागतील.

**पायरी १ : कौशल्याची पूर्ण ओळख :**

यामध्ये विशिष्ट आवश्यक कौशल्यांची तपशीलवार माहिती मिळवा.

**पायरी २ : स्वयंमूल्यमापन :**

ही कौशल्ये तुमच्याकडे आढळतात का ? याचे आत्मपरीक्षण करा. आढळत असल्यास किती वेळ, किती प्रसंगातून त्याचे दर्शन घडते हे लक्षात घ्या.

**पायरी ३ : सराव :**

एखादे कौशल्य आपल्याकडे कमी आहे किंवा मुळीच नाही हे लक्षात आल्यावर जाणीवपूर्वक ते आत्मसात करण्याचा अथवा वाढविण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी उद्योजकता प्रशिक्षण वर्गाचा उपयोग होऊ शकतो. त्यामध्ये कृत्रिम परिस्थिती निर्माण करुन आपल्यामधील विशिष्ट कौशल्याची पारख केली जाते.

**पायरी ४ : प्रत्यक्ष वापर :**

जाणीवपूर्वक जोपासलेल्या कौशल्यांचा जीवनातील प्रत्यक्ष परिस्थितीत वापर करा.

**पायरी ५ : परिणामांची पडताळणी :**

ही कौशल्ये प्रत्यक्ष वापरल्यावर आपल्या कार्यपध्दतीवर, वागणुकीवर, यशापयशावर काय परिणाम होतात याची दखल घ्या व त्याप्रमाणे सुधारणा करा.

**स्वत:ला ओळखा** ( Who I am ?) -

नवउद्योजकास जेव्हा स्वत:चा उद्योग-व्यवसाय सुरु करावा असे विचार डोक्यात सुरु होतात तेव्हा नेमके काय करावे ? हे प्रश्नचिन्ह आपल्यासमोर उभे राहते. उद्योग उभारणीस नेमके कुठुन सुरुवात करावी ? उद्योग कसा निवडावा ? कोणास भेटावे ? शासनांचे विविध कार्यालये व योजना कोणत्या ? कागदपत्रे काय लागतील ? जागा कुठे असावी ? मशिनरी कुठे मिळेल ? कच्चा माल कोठून आणावा ? बाजारपेठ कशी मिळेल ? व नेमके वरील गोष्टींमधून पहिल्यादा काय करावे ? हे न सुचल्यामुळे उद्योजक होण्यास अडचणी येऊ शकतात.

उद्योगाची निवड करणे हे फार कठीण काम आहे व तेवढे सोपेपण आहे. पण हे करताना आपण स्वत:ला ओळखणे आवश्यक आहे. म्हणजेच माझ्याकडे असणारी गुणसंपदा व माझे गुण-दोष याचे भान आपण ठेवले पाहिजे. पुष्कळदा असे होते की, आपल्या व्यक्तिमत्वामधील चांगल्या गुणांची आपल्याला माहितीच नसेत व त्या गुणांचा आपण वापरही करत नाही. तसेच आपले दोषही इतरांनी आपल्याला सहसा सांगितलेले आवडत नाही, त्यामुळे आपले व्यक्तिमत्व विकसित होत नाही. आपले दोष कमी करुन आपल्या चांगल्या गुणांचा जास्तीत जास्त वापर करुन आपणही यशस्वी उद्योजक होऊ शकतो.

शासनाच्या सोयी सवलतीमुळे किंवा अनुदानाच्या प्रेरणेतून किंवा घरच्यांच्या दडपणाखाली किंवा इतरांच्या यशाकडे व पैशाकडे पाहून अंधानुकरण करुन उद्योजक बनण्याचा निर्णय घेतलेला नसावा. निर्णय घेताना उद्योगासाठी अर्थसहाय्य घेण्याचा मानस असावा. कर्जासाठी उद्योग उभारणी करु नये. उद्योजक बनण्याच्या अशा सकारात्मक निर्णयानंतर त्या दिशेने कार्यास सुरुवात करावी. त्यापूर्वी स्वत:च्या क्षमतांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. माझ्या व्यक्तिमत्त्वातील चांगले गुण, गुण-दोष, संधी याचा अभ्यास करावा त्याचप्रमाणे माझी आर्थिक क्षमता, शिक्षण, अनुभव याचा विचार करावा म्हणजेच प्रकल्पामागचा माणूस सक्षम होऊ शकेल. प्रकल्प मंजूर करताना वित्तसंस्था या क्षमतांचा निश्चित विचार करतात याला उद्योजकीय सक्षमता म्हणतात.

उद्योजक होताना आपण आपल्या आवडींचाच उद्योग निवडावा तसेच आपले शिक्षण व आर्थिक परिस्थिती, अनुभव यांचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणजेच मी काय करु शकतो ? व काय करु याचा विचार करुन आत्मपरीक्षण करणे फायदेशीर ठरते. स्वत:ला ओळखणे म्हणजेच नेमके काय ? यामध्ये आपण स्वत:लाच प्रश्न विचारावा की, आतापर्यंत भूतकाळामध्ये मी काय केले ? सध्या वर्तमानकाळात मी काय करत आहे ? भविष्यकाळात मला नेमके काय करावयाचे आहे ? हे एकदा आपल्याला समजले की, आपल्याला आपले उद्योगाचे ध्येय निश्चित करण्यास मदत होईल व आपल्या चांगल्या गुणांचा वापर करुन, आपले दोष कमी करुन आपले व्यक्तिमत्त्व उद्योजकीय होऊ शकेल. यालाच शास्त्रीय भाषेत सिध्दीप्रेरीत व्यक्तिमत्व असे म्हणतात.

जीवनाचे ध्येय एकदा ठरले की मग सुरु होते ते कल्पकतेचे कारण ज्या वेळी आपण ध्येय ठरवितो त्यावेळी ते नुकतेच स्वप्न असते त्यामुळेच कल्पकता म्हणजे ध्येय पूर्तीच्या दिशेने टाकलेले पहिलं पाऊल होय. ध्येयाची निश्चिती केल्याने आपण स्वावलंबी होतो. स्वत:चा पुढाकार, कल्पकता, उत्साह, शिस्त आणि नियोजन यांचा योग्य तो मेळ घालता येतो वेळोवळी दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागत नाही. कारण प्रगतीचे मूळ आत्मपरीक्षणातच आहे.

**यशस्वतीतेसाठी उद्योजकाचे अंगी असावेत असे लाख मोलाचे गुण -**

उत्साही वृत्ती, जिद्द, चिकाटी, धडाडी, शिकण्याची तयारी, मदत स्वीकाण्याची तयारी, विचारपूर्वक धोका पत्करण्याची तयारी, निर्णय घेण्याची क्षमता, भविष्य काळाचा वेध घेण्याची क्षमता, स्वत:च्या क्षमतांचा अंदाज, पुढाकार घेण्याची वृत्ती, संभाषण कला, उत्तम जनसंपर्क, ध्येयनिश्चिती वास्तववादी, सृजनशीलता, प्रयोगशीलता, नवनवीन गोष्टींबद्दलची उत्सुकता नम्रता, सहनशीलता व आत्मपरीक्षण.

**प्रकल्प अहवाल, उद्योग उभारणीतील महत्वाचे टप्पे -**

**प्रकल्प अहवाल**

**योजनेचा सामान्य आराखडा**

**अ) ओळख**

१. उद्योजकाचे नाव.

२. कारखान्याचे नाव.

३. पत्ता.

४. घटना (मालकी/भागीदारी/मर्यादित कंपनी इत्यादी).

५. उद्योजकाची पार्श्वभूमी उत्पादन / व्यवसाय तपशील.

६. उत्पादनास उपलब्ध बाजारपेठ.

७. उत्पादन पद्धतीबाबत माहिती.

८. बाजारपेठेतील स्पर्धा.

९. कारखाना / व्यवसाय ठिकाण.

१०. कच्च्या मालाची उपलब्धता.

**ब) योजना-भांडवल उभारणीबाबत माहिती**

१. जागा व इमारत (क्षेत्रफळ) (स्वत:ची / भाडयाची)

२. मशिनरी

| अ.क्र. | नाव/तपशील | भातीय/परदेशी बनावटीची | संपूर्ण तपशील/अश्वशक्ती उत्पादन क्षमता | किंमत (रु) |
|---|---|---|---|---|

**एकूण रु. ..............................**

३. इतर गुंतवणूक

१. वीज

२. फिक्सचर्स

३. फर्निचर

४. एकूण भांडवली खर्च (१+२+३) रु. ............................

५. नोकर वर्गावर होणारा खर्च

अ. कार्यालयासाठी – द.म.पगार (रु)

ब. उत्पादनासाठी तांत्रिक नोकर वर्ग – द.म. पगार (रु)

एकूण रु. ............................

६. कच्चा माल

| **अ.क्र.** | **तपशील** | **एक महिन्याची गरज** | **वजन/संख्या** | **किंमत (रु)** |
|---|---|---|---|---|
| | | | | ............................... |

**एकूण रु. ...............................**

७. इतर खर्च (रु)

अ. वीज

ब. पाणी

क. जाहिरात व प्रवास

ड. स्टेशनरी

इ. इतर

एकूण रु. ............................

८. एकूण आवर्ती खर्च (५ अ ६अ ७)

खेळती भांडवल ३ महिन्याकरीता रु. ............................

(एकूण आवर्ती खर्च ×३) रु. ............................

९. भांडवली गुंतवणुकीची व्यवस्था

| अ.क्र. तपशील | स्वत: | वित्त संस्था | बीज भांडवल | एकूण |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |

---

**१. स्थिर भांडवल**

**२. खेळते भांडवल**

---

१०. मासिक विक्री

| उत्पादीत वस्तू | एकूण उत्पादन | दर | एकूण विक्री किंमत रु. |
|---|---|---|---|

एकूण रु. .............................

वार्षिक उत्पादन खर्च रु.

वार्षिक आवर्ती खर्च रु.

दुरुस्ती व देखभाल (३.५% ) रु.

घसारा यंत्रसामुग्री (१०%) रु.

गुंतवणुकीवरील व्याज रु.

इमारतीवरील घसारा (५%) रु.

एकूण रु. .............................

एकूण नफा – वार्षिक विक्री – वार्षिक उत्पादन खर्च (रु.) .............................

वार्षिक कर आकारणी – (रु.) .............................

निव्वळ नफा – एकूण नफा – कर आकारणी (रु.) .............................

१. यंत्रसामुग्री पुरविणाऱ्याचे पत्ते

२. कच्चा माल पुरवठादाराचे पत्ते

(उद्योजकाची स्वाक्षरी)

---

ग्रामीण भागात नवीन लघुउद्योग काढू इच्छिणाऱ्या व सध्याच्या उद्योगाची वाढ करु इच्छिणाऱ्या उद्योजकांना आवश्यक ते सर्व सहाय्य एकाच ठिकाणी मिळावे या हेतूने केंद्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात एक उद्योग केंद्र स्थापन केले आहे. आपणास फळप्रक्रिया हा एक लघुउद्योग म्हणून सुरु करावयाचा असल्यास आपण वरीलप्रमाणे तयार केलेला प्रकल्प अहवाल या उद्योग केंद्राकडे सादर करुन आपली योजना त्यांचेकडून मंजूर करुन घ्यावी.

**उद्योगाची निवड व उभारणीच्या पायऱ्या –**

ग्रामीण युवक, युवती, शेतकरी वर्ग व महिलांच्या स्वालंबनासाठी उद्योगाच्या अनेक सुसंधी व शासकीय कर्ज योजना उपलब्ध आहेत. अनेक उद्योग असे आहेत की, ते सुरु करण्यास फार मोठया भांडवलाची आवश्यकता नसते. घरबसल्या थोडयाशा भांडवलात उद्योग सुरु करता येतो. आपल्या आवडीनुसार एखादा उद्योग निवडून अशा उद्योगसंधी योजनांची माहिती, उद्योगासाठी लागणारी कौशल्यता, मशिनरी, कच्चामाल ते प्रक्रिया व बाजारपेठचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे.

उद्योग कोणताही असो, तो सुरु कसा करावा ? याला फार महत्त्व असते. आपण जे उत्पादन करणार आहोत त्यास बाजारपेठ जवळ कोठे आहे ? वीज–पाण्याची सोय आहे का ? लघुउद्योगांना मिळणाऱ्या सवलती तेथे मिळू शकतील काय याचा विचार करणे आवश्यक आहे. आपण ज्या वस्तूचे उत्पादन करणार आहोत त्याला बाजारपेठेत मागणी किती आहे, किती स्पर्धक आहेत. यासाठी प्रत्यक्षरित्या बाजारपेठ पहाणी करणे, आापले उत्पादन नफ्यासहित लवकर विकण्यासाठी आपण त्याची किंमत, इतर स्पर्धकांच्या तुलनेने कमी ठेवू शकतो काय ? किंवा त्यांच्यापेक्षा चांगला माल, आकर्षक पॅकिंगसह योग्य

किंमतीमध्ये तयार करु शकतो काय ? याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. उद्योग उभारणीच्या दृष्टीने योग्य दिशा मिळू शकते.

**उद्योग उभारणीतील महत्त्वाचे गोष्टी -**

**१) आपण निवडलेल्या उद्योगाचे नाव व प्रकार -**

१) दैनंदिन उत्पादन २) औद्योगिक उत्पादन ३) शेतीवर आधारीत.

२) उद्योगाचा प्रकार – १) निर्मिती २) सेवा ३) व्यापार.

३) आपल्यासारखेच उद्योग करणारे किती समव्यावसायिक आहेत त्यांची यादी तयार करा.

४) आपल्या सारखेच स्थानिक व्यावसायिक आहेत काय ?

५) स्थानिक व्यावसायिकांची महिन्यावर विक्री किती असते ?

६) आपली महिन्याची विक्री किती आहे ?

७) स्पर्धकांच्या खरेदी किंवा निर्मिती किंमती काय आहेत ?

८) आपली उत्पादन किंमत किंवा निर्मिती किंमती काय असतील ?

९) स्पर्धकांच्या महिन्याचा नफा किती आहे ?

१०) आपल्याला किती नफा होऊ शकेल ?

११) स्पर्धक उत्पादनाची विक्री कशी करत आहेत ?
(थेट, मध्यस्थ, किरकोळ)

१२) आपण आपल्या उत्पादनाची विक्री कशी करणार ?

१३) स्पर्धकांनी आपल्या उत्पादनाची जाहिरात कशी केली ?

१४) आपण आपली जाहिरात कशी करणार ?

१५) प्रकल्पासाठी योग्य जागा उपलब्ध आहे काय ?

१६) मशिनरी निर्माते कोणते ? चांगली मशिनरी कुठे मिळेल ?

१७) कच्चा माल योग्य भावात कुठे मिळेल ?

१८) बाजारपेठ स्थानिक, विभागीय, संपूर्ण देशभर क्षेत्र ठरविणे ?

१९) एकूण क्षेत्रफळ, लोकसंख्या, आवडी–निवडी ?

२०) नैसर्गिक साधनसंपत्ती इ. माहिती.

या सर्व गोष्टीचा अभ्यास स्वतः प्रत्यक्षरीत्या केल्यास, स्वतःचा प्रकल्प यशस्वी होईल का नाही याची खात्री होईल. योग्य प्रकल्प निवडण्यास व आपला आत्मविश्वास वाढून यशस्वी उद्योजक होण्यास मदत होईल. बाजारपेठ पाहणी स्वतःकेल्याने आपले व्यक्तिमत्व सुद्धा विकसित होण्यास मदत होईल. म्हणजेच आपण नवीन ठिकाणी असा संपर्क साधायचा ? कसे बोलायचे ? प्रकल्पाची सविस्तर माहिती कशी मिळवायची ? संभाषण कला, जनसंपर्क कला, विकसित होण्यास पण मदत होईल. इतर नवीन उद्योग संधीसुद्धा आपला दरवाजा ठोठावतील.

**अर्थ व्यवस्थापन -**

**भांडवलाचा अंदाज -**

प्रकल्प आराखडा तयार झाल्यावर प्रकल्प उभारणी लागणाऱ्या भांडवलाचा नेमका अंदाज येतो. आता पुढील टप्पा आहे भांडवल उभारणीचा व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या जुळवाजुळवीचा.

**भांडवलाची गरज -**

प्रथम स्थिर मालमत्ता निर्माण करण्यासाठी भांडवल लागते. यामध्ये बाबींवरील खर्चांचा समावेश होतो. ही गुंतवणूक एकदाच करावी लागते.

**१. जमीन व जमीन विकास**

- जमिनीची खरेदी किंमत
- कायदेशीर फी
- जमिनीचे सपाटीकरण
- कारखान्याकडे जाणारा रस्ता व अंतर्गत रस्ते
- कुंपण

**२. इमारत व बांधकाम**

- कारखान्याची इमारत
- प्रशासकीय इमारत
- गोदामे
- पाणीपुरवठा व्यवस्था

- गॅरेजेस
- स्टाफ क्वार्टर्स
- आर्किटेक्टची फी

**३. यंत्रसामुग्री**

- यंत्रसामुग्रीची किंमत
- आयात शुल्क
- विक्रीकर
- अबकारी कर
- वाहतूक खर्च
- वाहतूक विमा
- जादा सुटे भाग
- यंत्रसामुग्रीचा पाया उभारणी खर्च

**४. इतर स्थिर मत्ता**

- फर्निचर
- कार्यालय उपकरणे
- वाहने
- प्रयोगशाळा उपकरणे
- अग्निशामक उपकरणे
- बॉयलर्स
- प्रदूषण नियंत्रण उपकरणे
- डिझेल, वीजनिर्मिती संयंत्र वगैरे

**५. तंत्रज्ञान परवाना फी**

**६. प्राथमिक व उत्पादनपूर्व खर्च**

- नोंदणी खर्च
- प्रकल्प अहवाल खर्च
- प्रवास खर्च
- व्याज
- कर्ज उभारणी खर्च वगैरे

**७. खेळत्या भांडवलाचे मार्जिन**

**८. आकस्मिक खर्चांची तरतूद**

(साधारणपणे १ ते ७ च्या १० टक्के)

**९. एकूण प्रकल्प किंमत अथवा स्थिर भांडवलाची गरज :**

(वरील १ ते ८ ची बेरीज)

**खेळत्या भांडवलाचे निर्धारण –**

सुरवातीच्या स्थिर भांडवलाव्यतिरिक्त व्यवसाय चालवीत असताना सतत भांडवल लागते. उत्पादन तयार झाल्यावर विक्रीमधून येणाऱ्या पैशाला विलंब लागत असल्यामुळे मधल्या काळात आपले भांडवल गुंतवावे लागते. विक्रीचे पैसे आले की हे भांडवल मोकळे होते. हे चक्र अव्याहत चालू असते. या फिरत्या भांडवलाला खेळते भांडवल म्हणतात. व्यवसायासाठी खेळत्या भांडवलाचा नीट अंदाज घेणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्या लागतात.

**पहिल्या वर्षीची प्रत्यक्ष उत्पादन क्षमता –**

**१. या उत्पादन क्षमतेवर आधारित कच्च्या मालाची गरज.**

**२. कच्च्या माल साठवण :**

कच्च्या मालाची उपलब्धता, किमतीमधील चढउतार, साठवण क्षमता, कच्च्या मालाचा प्रकार (उदा. मोसमी, नाशवंत, टिकाऊ) साठवण निर्बंध इत्यादी बाबींचा विचार करुन कच्च्या मालाचा १५ दिवस ते ३ महिन्यांचा साठा करुन ठेवावा लागतो. याच पद्धतीने सुटे भाग, पॅकिंग मटेरियल वगैरे इतर बाबीच्या साठयाचा विचार करावा लागतो.

**३. कच्चा माल व इतर साठयासाठी भांडवल :**

वरील साठयासाठी भांडवलाचा हिशेब लावावा लागतो.

**४. अर्धवट उत्पादित :**

कच्च्या मालावर प्रक्रिया होऊन पक्का माल लगेच तयार होत नाही. काही दिवस काही माल हा अर्धवट उत्पादन प्रक्रियेत राहतो. त्यामध्येही भांडवल अडकून राहते.

**५. उत्पादित मालसाठा :**

काही उत्पादित माल हा विक्री होईपर्यंत कारखान्यात पडून राहतो. या मालाची किंमत धरावी लागते. कारण त्यामध्येही

भांडवल अडकून राहते.

**६. उधारीत अडकलेले पैसे :**

माल विक्रीसाठी गेल्यावर विक्रीचे पैसे रोखीने येत नाहीत. काही दिवस उधारी द्यावी लागते.

७. कर्मचारी वेतन व भत्ते (एक महिन्यासाठी).

८. वीज, पाणी व इंधनावर एक महिन्याचा खर्च.

९. प्रशासकीय, विक्री, इतर बाबींवर एक महिन्याचा खर्च.

वरील ४ ते १० मुद्यांची बेरीज केल्यास खेळत्या भांडवलाचची रक्कम निघेल.

**भांडवल उभारणीचे मार्ग –**

प्रकल्पासाठी लागणारे भांडवल उद्योजकाला खालीलप्रमाणे विविध मार्गांनी उभारावे लागते.

- प्रवर्तकाचे भागभांडवल.
- मित्र व नातेवाईक व कुटुंबियांकडून बिनव्याजी, विनातारण कर्ज.
- वित्तीय संस्थेकडून तारणावर कर्ज लघुउद्योगांना स्थिर गुंतवणुसाठी दीर्घमुदतीचे हे कर्ज साधारणपणे ७५ टक्के व ७ ते १० वर्षाच्या परतफेड कालावधीसाठी मिळते.
- नावीन्यपूर्ण प्रकल्पासाठी व्हेंचर कॅपिटल कंपन्यादेखील भाग भांडवल स्वरुपात अर्थ सहाय्य देतात. टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट ॲण्ड इन्फॉरमेंशन कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड (टीडीआयसीआय) ही एम नामवंत व्हेंचर कॅपिटल कंपनी आहे.
- सुशिक्षित बेरोजगारांना बीज भांडवल योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनातर्फे बीज भांडवल स्वरुपात १० टक्के व्याजाचे कर्ज दिले जाते.
- सुशिक्षित बेरोजगारांना पंतप्रधान योजनेअंतर्गत एक लाखापर्यंत अनुदानासह कर्ज दिले जाते.
- सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत लघुउद्योगांना स्थिर भांडवली गुंतवणुकीवर अनुदान दिले जाते.
- या व्यतिरिक्त यंत्रसामुग्री भाडेतत्वावर अथवा हप्तेबंदीने पुरविणाऱ्या कंपन्या आहेत.

**अर्थसहाय्य योजना –**

लघुउद्योगांना अर्थसहाय्यासाठी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, राष्ट्रीयीकृत बँका, नागरी सहकारी बँका, खाजगी अर्थ कंपन्या व व्हेंचर कॅपिटल कंपन्या काम करतात.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातर्फे स्थिर मालमत्तेकरीता दीर्घमुदतीचे कर्ज दिले जाते. बँकांमार्फत खेळत्या भांडवलासाठी अल्पमुदतीचे कर्ज दिले जाते. मात्र बँका दोन्ही प्रकारचे कर्ज देऊ शकतात. लघु उद्योगांना अर्थसहाय्य करण्यासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँक या शिखर बँकेची स्थापना करण्यात आली आहे. या बँकेतर्फे इतर बँकांना लघुउद्योग अर्थसहाय्यासाठी पुनर्वित सहाय्य दिले जाते.



| आपल्या कामासाठी कोठे संपर्क साधावा ? | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कार्यालयाचे नाव व पत्ता |
| १. | कृषी उद्योगाची निवड/कृषी उद्योजकता प्रशिक्षण/शेतीपूरक व्यववसायाची, तंत्रज्ञानाची माहिती | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी<br>मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला<br>डॉ. बाळासाहेब सांवत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली<br>कृषी विज्ञान केंद्र – प्रत्येक जिल्ह्यामध्ये<br>महाराष्ट्र शासन कृषी विभाग<br>ॲग्रीकल्चरल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट एजन्सी<br>कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रकल्प, अ. नगर |
| २. | कृषी उद्योजकता विकास प्रशिक्षण / आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध कार्यक्रम | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अ/३८, एम. आय. डी. सी. रेल्वेस्टेशन एरिया, औरंगाबाद–४३१००१ |
| ३. | फुड प्रॉडक्स् / खाद्यान्न प्रक्रिया माहिती तंत्रज्ञान, प्रशिक्षण | खादी ग्रामोद्योग महामंडळ<br>राष्ट्रीय फलोत्पादन खाते<br>महाराष्ट्र शासन, फुड अॅण्ड न्युट्रीशन डिपार्टमेंट, कृषी विद्यापीठे<br>सेंट्रल फुड अॅण्ड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटयूट, भवन्स कॉलेज कॅम्पस, मुंबई |
| ४. | फळबाग लागवड–प्रक्रिया/ प्रशिक्षण, बाजारपेठ व निर्यात योजना माहिती | नॅशनल हॉर्टीकल्चर डेव्हलपमेंट बोर्ड, एरिया, सेक्टर नं. १८, गुरगांव (हरियाणा) पिन –१२२०१५<br>असि. डायरेक्टर, नॅशनल हॉर्टीकल्चर बोर्ड, रु. न. ३१७, ४ था मजला, सेंट्रल फॅसिलिटी बिल्डींग, ए.पी.एम. जी. फ्रुट मार्केट कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. १९, तुर्भे, वाशी (नवी मुंबई) |
| ५. | पशु विकास, प्रशिक्षण, कर्ज योजना, अनुदान योजना | उपसंचालक, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन (प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी) |
| ६. | वनौषधी लागवड प्रक्रिया, प्रशिक्षण, तांत्रिक ज्ञान | सेंट्रल इन्स्टिटयूट फॉर मेडिसिनल अॅण्ड ॲरोमॅटिक रिसर्च, लखनौ धन्वंतरी प्रकल्प,<br>म. फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अ.नगर |
| ७. | दुग्ध प्रक्रिया/डेअरी फार्मिंग/ डेअरी पदार्थ | नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड, आनंद (गुजरात) |

| | | |
|---|---|---|
| ८. | यंत्रसामुग्रीकरिता तांत्रिक ज्ञान व माहिती | राष्ट्रीय लघुउद्योग निगम विभागीय कार्यालय, प्रेस्टीज चेंबर्स, कल्याण स्ट्रीट, मस्जीद बंदर, मुंबई -४०० ००९ |
| ९. | शेती व अवजारे व साधने / फौंड्री | लघुउद्योग सेवा संस्था, भारत सरकार प्लॉट नं. ३२/३३, एम. आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद |
| १०. | खाद्य प्रक्रिया उद्योग अनुदान व कर्ज योजना | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ॲग्रो इंड. डेव्हलमेंट कार्पोरेशन, राजन हाऊस, प्रभादेवी मुंबई (प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी) |
| ११. | कृषी कर्ज योजना व पुर्नवत्त, सामुहिक उद्योग घटक विकास | नॅशनल ॲग्रीकल्चर रुरल डेव्हलपमेंट बँक जिल्हा विकास व्यवस्थापक (प्रत्येक जिल्ह्यात) |
| १२. | कृषी विकास व संशोधन अनुदान | इंडियन कौन्सील फॉर ॲग्रीकल्चर रिसर्च, नवी दिल्ली |
| १३. | फुलशेती निर्यात | महाराष्ट्र राज्य कृषी पणन व निर्यात महामंडळ मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे |
| १४. | कृषी व खाद्यान्नासाठी लागणारी यंत्रसामुग्री, निर्यात परवाना व उत्पादीत मालाची निर्यात (बाजारपेठ) | जॉईंट ऑफ इम्पोर्टस अँड एक्स्पोर्टस् न्यू. सी. जी.ओ. बिल्डींग, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० २०२०<br>स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., १५९, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०<br>ॲग्रीकल्चरल प्रोडयुस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट एजन्सी (अपेडा) १२ वा मजला, युनिट नं. १, एम.व्ही.आय.डी.सी. वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५ |
| १५. | हवाबंद फळे/मच्छिसहित अन्न प्रक्रिया उद्योग डिपार्टमेंट | डेप्युटी डायरेक्टर, फ्रुट अँड व्हेजिटेबल न्यू सी.जी.ओ. बिल्डींग, न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०० ३४ |
| १६. | आय. एस. आय. मार्क (क्षेत्रिय कार्यालय) | भारतीय मानक संस्था, महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कॉपोरेशन बिल्डींग, १ ला मजला, प्लॉट नं ६५७ ते ६६०, गुलटेकडी, मार्केट यार्ड, बस स्थानक, पुणे-३७ |
| १७. | एफ.पी.ओ. ट्रेड मार्क | संचालक, अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय, ३१९, जुनी सेंट्रल गव्हर्नमेंट बिल्डींग, महर्षी कर्वे रोड, मुंबई - ४०० ०२० |
| १८. | पेटंट व डिझाईनची नोंदणी | कंट्रोल ऑफ पेटंटस् अँड डिझाईन्स, २१४, जगदीशचंद्र बोस रोड, कलकत्ता-१७ |

| | | |
|---|---|---|
| १९. | ॲगमार्क मिळणेबाबत | डायरेक्टर ऑफ मार्केटींग अँड इन्स्पेक्शन ॲगमार्क डिव्हीजन, न्यू.सी.जी.ओ. बिल्डींग, न्यू मरिन लाईन्स, मुंबई ४०० ०२० |
| २०. | पेटंट, डिझाईन, ट्रेड मार्कस् व कॉपीराईट रजिट्रेशनसाठी | भाटे ॲण्ड पोंक्षे (गर्व्ह. रजि. पेटंट ॲटर्निज) २८, इलेक्ट्रॉनिक्स को. ऑप. इस्टेट, तळ मजला, पुणे सातारा रोड, पुणे |
| | | |
| १. | कर्ज योजना मंजुरी लघुउद्योग नोंदणी | जिल्हा उद्योग केंद्र/उद्योग सहसंचालक<br>जिल्ह्याच्या ठिकाणी / विभागप्रमाणे |
| २. | प्लॉट व शेड मिळण्यासाठी<br>अ. एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्रात<br>ब. सहकारी औद्योगिक वसाहत<br>क. लघु औद्योगिक वसाहत | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र<br>विभागीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (जिल्ह्याच्या ठिकाणी)<br>संपर्क – संबंधित औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष<br>जिल्हा उद्योग केंद्र – जिल्ह्याच्या ठिकाणी |
| २. | कारखान्याच्या आराखडयाची मंजुरी, नोंदणी व अनुप्राप्ती | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व कारखाने प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणी |
| ३. | वनसंपत्ती उद्योगास परवाना | असिस्टंट कंझर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, मुंबई |
| ५. | वित्तपुरवठा –<br>अ. मुदत कर्ज<br>ब. खेळते कर्ज<br>क. बीज भांडवल, अनुदान | विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ जिल्ह्याचे ठिकाणी/विभागाप्रमाणे<br>राष्ट्रीयकृत अथवा व्यापारी बँका<br>महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र<br>जिल्ह्याचे ठिकाणी/विभागाप्रमाणे |
| ६. | महिला आर्थिक विकास महामंडळ | जिल्हास्तरावर कार्यालय |




**सारांश –**

भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषी उद्योजकता ही काळजी गरज आहे. औद्योगिक क्रांतीचा सुद्धा आपण पाहिजे तसा मागोवा घेऊ न शकल्याने आता स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षात औद्योगिक विकासाचा अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. त्यासाठी आणि समाजाचा आर्थिक उत्कर्ष साधण्यासाठी कृषी उद्योजकतेचा सर्वंकष प्रसार हेच आपले ध्येय असले पाहिजे. विकासाच्या सर्वच क्षेत्रात आघाडीवर असणारे महाराष्ट्र राज्य उद्योगाचे बाबतीत देखील अग्रभागी आहे. मात्र केवळ राज्यात उद्योगांची संख्या जास्त असल्यामुळे राज्याच्या जनतेमध्ये उद्योजकता आहे असे होत नाही. महाराष्ट्रात उद्योग आहेत मात्र उद्योगात महाराष्ट्र नाही असे त्यामुळे म्हटले जाते. म्हणूनच महाराष्ट्रातील ग्रामीण युवक–युवतींमध्ये उद्योजकतेचा विकास हे अलिकडच्या काळातील आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. कृषी उद्योग सुरु करण्यासाठी पूर्वतयारी, उद्योगाचे व्यवस्थापन, शासनाचे उद्योगासंबंधी कायदे, अर्थसहाय्य योजना, प्रशिक्षण, तंत्रज्ञान, निर्यात व्यापार भविष्याचा वेध इत्यादि सर्व बाबींना स्पर्श करुन उद्योजकांसाठी सविस्तर अचूक व अद्ययावत माहिती असणे आवश्यक आहे. कारण आता कृषी उद्योग हे पूरक उद्योग व्यवसाय न ठरता पूर्ण व्यावसायिकपणे करणे गरजेचे आहे. पशुपालन, पॉली हाऊस, ग्रीन हाऊस, फुलशेती, फळबाग, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, तेलबिया आणि डाळ प्रक्रिया, गांडूळ खत निर्मिती, कृषी औजारे इत्यादी अनेक कृषी उद्योगांद्वारे शेतकरी कुंटुबाचा, गावाचा, राज्याचा व अंतिमतः देशाचा आर्थिक विकास साधला जाऊ शकतो. त्यामुळेच जागतिकीकरणाच्या छत्रछायेत एकविसाव्या शतकात युवा पिढीला आता उद्योजकता विकासाचीच कास धरावी लागणार आहे.

